क्र

महाराष्ट्र पोलीस दलातील अधिकारी व अंमलदार व त्यांच्या कुटूंबियांसाठी कल्याणकारी योजना राबविणे, तसेच विविध सोयीसूविधा पूरविणे त्याकरीता आवश्यक निधी उभारण्यासाठी महाराष्ट्र पोलीस दलातर्फे मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २९) अन्वये, **"महाराष्ट्र पोलीस फाऊंडेशन"** या नावाची ट्रस्ट दिनांक १६/०७/२०२४ रोजी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांच्या नोंदणी पुस्तकातील क्रमांक **E-००३८८८६ (GBR)** नुसार स्थापन करण्यात आली आहे.

**०२.** **"महाराष्ट्र पोलीस फाऊंडेशन"** ट्रस्टच्या माध्यमातून देणगी स्वरुपात प्राप्त होणाऱ्या निधीमधून महाराष्ट्र पोलीस दलासाठी खालीलप्रमाणे उद्दिष्टे साध्य करता येतील :-

१. महाराष्ट्र पोलीस विभागाची कार्यक्षमता, मानके, कौशल्य व तंत्रे इ. यांचा स्तर उंचविण्यासाठी.

२. पोलीस दलाकरीता आरोग्य, प्रशिक्षण, शिक्षण, मुलभूत आणि पायाभूत सुविधा इ. पुरविण्यासाठी.

३. पोलीस दलाच्या कार्यक्षमतेचा दर्जा सुधारण्यासाठी पोलीस स्टेशन, पोलीस लाईन्स, निवासस्थान, बॅरेक्स, प्रशिक्षण केंद्र / अकादमी इ. यासह तेथील पाणीपुरवठा आणि सांडपाणी यांची दुरुस्तीसाठी मदत करणे.

४. महाराष्ट्र पोलीस दलाची कार्यक्षमता वाढविण्यासाठी पोलीस स्टेशन व घटक कार्यालयाचे संगणकीयकरण, अत्याधूनिक साधणे पुरविणे आणि अभिलेख इलेक्ट्रॉनिक पध्दतीने जतन करणे.

५. कायदा व सुव्यवस्थेच्या परिस्थितीला प्रभाविपणे हाताळण्यासाठी पोलीसांकरीता आधूनिक व संरक्षण उपकरणाची खरेदी करणे.

६. पोलीस व जनतेमधील सुसंवाद आणि जातीय सलोखा वाढविण्यासाठी जनजागृतीचे उपक्रम राबविणे.

७. पोलीसांना देशात व विदेशात उच्चशिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती देणे.

८. पोलीस दलात वापरण्यात आलेले विविध स्वरुपाचे शस्त्र व इतर महत्वाची ऐतिहासिक घटनांची माहिती संग्रहालयाच्या माध्यमातून सामान्य जनतेकरीता उपलब्ध करुन देणे.

९. सायबर गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी व तसेच नागरिकांना अशाप्रकारच्या गुन्ह्यांबाबत सर्तक करण्यासाठी जनजागृती करीता पोलीस अधिकारी व अंमलदार यांना प्रशिक्षण देऊन विविध साधन सामुग्री पूरविणे.

१०. पोलीस व जनतेमधील सुसंवाद वाढविण्यासाठी तसेच नागरिकांमध्ये सुरक्षाविषयक जनजागृती करण्यासाठी ज्ञानवर्धक सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम आणि कार्यशाळा यासारखे विविध उपक्रम राबविणे.

११. पोलीस घटक / आस्थापनांमध्ये पर्यावरणविषयक जागरुकता करण्याकरीता जलसंधारण, कचरा व्यवस्थापन आणि हरीत उपक्रम यासारखे विविध उपक्रमे राबविणे.

**०३.** सदरच्या ट्रस्टचे कामकाज सुरळीत हाताळण्यासाठी खालील नमूद **एकूण ०७ विश्वस्त** कार्यरत आहेत, त्यापैकी ०५ विश्वस्त हे प्रशासकीय कामकाजाचा अनुभव असलेले व उर्वरित ०२ विश्वस्त हे नामांकित कंपनीचे पदाधिकारी आहेत.

१. श्रीमती सुजाता सौनिक, अपर मुख्य सचिव (गृह विभाग), मंत्रालय, मुंबई. (अति. कार्यभार)

२. श्रीमती रश्मि शुक्ला, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

३. श्री. संजय सक्सेना, अपर पोलीस महासंचालक (कायदा व सुव्यवस्था), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

४. डॉ. निखिल गुप्ता, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

५. डॉ. आरती सिंह, विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

६. श्री. नागराज राव, प्रशासन व सुरक्षा प्रमुख (AFS), महिंद्रा ॲन्ड महिंद्रा लिमिटेड.

७. श्री. अजय भट, उपाध्यक्ष, गोदरेज इंडस्ट्रीज लिमिटेड.

****